# EVENT

**दिनांक १२ डिसेंबर २०१९**

## एस.एम. जोशी महाविद्यालयात शरदचंद्रजी  पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

पुणें १२ : रक्तदान हे श्रेष्ठदान आहे.आज विज्ञानात खूप प्रगती  झाली असली तरी माणूस रक्त तयार करू शकत नाही.दर दिवशी पन्नास हजार रक्ताच्या बॉटल  लागतात. आज माणूस जाती, धर्म ,पंथात विभागला असे असले  तरी माणूस एकच आहे. तो स्वतःचा  ब्लडग्रुप  बदलू शकत नाही, असे विचार नोबेल हॉस्पिटलचे मॅनेजिंग  डायरेक्टर डॉ. दिलीप माने  यांनी  मांडले. ते एस. एम. जोशी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व एन. सी. सी.सी. या विभागाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात बोलत होते.  शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्या वाढदिवसानिमित्त  रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.

रक्तदान शिबिराच्या उदघाटन समारंभाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे सचिव  प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांनी मोलाचे विचार मांडले. ते म्हणाले की,  समाजकारण आणि राजकारण यांचा सुरेख मेळ मा. शरदचंद्रजी पवारसाहेब  यांनी घातला. शरदचंद्रजी पवार म्हणजे तरुणाच्या हृदयाचे स्पंदन जाणणारे नेता आहेत. ते समाजभान जपणारे नेते आहेत, असे डॉ. भाऊसाहेब कराळे म्हणाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद बुरुंगले यांनीं  तरूणांनी सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी रक्तदान करावे असे आवाहन केले. महाविद्यालयातील एकशे अकरा युवकांनी रक्तदान केले. या समारंभाला रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ.विजयसिंह सावंत ,प्राचार्य डॉ. के. एच.शिंदें ,प्राचार्य डॉ. एल.डी. भोर, डॉ. शंतनू जगदाळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी डॉ संजय जगताप यांनी प्रास्ताविक केले. नम्रता मेस्त्री यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राजेन्द्र ठाकरे यांनी आभार मानले.




एस.एम. जोशी महाविद्यालयात शरदचंद्रजी  पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर